पुण्य नगरी

# सायबर कॉन्क्लेव्हला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## ७०० पेक्षा अधिक विद्यार्थी, २२ महाविद्यालयांचा सहभाग

**मुंबई** : व्हाट नाऊ तर्फे वाय. बी. चव्हाण सभागृहात सायबर कॉन्क्लेव्ह आयोजित करण्यात आले होते. या सायबर कॉन्क्लेव्हमध्ये २२ महाविद्यालयांचा सहभाग असून ७०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे उपस्थिती लावली.

या कार्यक्रमाचे नेतृत्व व्हाट नाऊच्या संस्थापक नीती गोयल आणि सह-संस्थापक अक्षत खेतान यांनी केले. या कॉन्क्लेव्हमध्ये वरिष्ठ धोरणकर्ते, कायदा अंमलबजावणी यंत्रणांचे अधिकारी, कायदेविषयक तज्ज्ञ तसेच युवक प्रतिनिधी सहभागी झाले होते. सायबर जागरूकता, डिजिटल सुरक्षितता आणि उदयोन्मुख सायबर धोके यांवर सखोल चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच हरयाणाचे युवक व रोजगार मंत्री गौरव गौतम, एडीजीपी यशस्वी यादव, कायदेविषयक तज्ज्ञ शायना एनसी आदी उपस्थित होते.

Mumbai Edition
Jan 12, 2026 Page No. 06
Powered by: erelego.com